# देशाने लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे: डॉ.एम.के.कांबळे



श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये वाढती लोकसंख्या आर्थिक विकासात अडथळा या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.एम.के.कांबळे समवेत डॉ.भारती शिंदे,डॉ.विजयकुमार पाटील,डॉ.बी. एन.रावण,डॉ.एस.एस.कुरलीकर,डॉ. मनीषा पाटील

कोणत्याही देशाची लोकसंख्या ही त्या देशाची नैसर्गिक साधनसंपत्ती आहे.क्रीयाशील लोकसंख्येमुळे देश बलवान होतो. पण जर लोकसंख्या अक्रियाशील असेल तर देशाची प्रगती होत नाही अशी लोकसंख्या देशाला भूषणावह नसते.त्यामुळे देशाने लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे यासाठीच जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो असे प्रतिपादन डॉ.एम.के.कांबळे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त वाढती लोकसंख्या : आर्थिक विकासात अडथळा या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.एम.के.कांबळे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

यावेळी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण, सहसमन्वयक डॉ.एस.एस.कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मनीषा पाटील यांनी केले आभार डॉ.एस.एस.कुरलीकर यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ.भारती शिंदे यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.